**<u>स्पेशल दिवाणी मुकदमा क्र.१०९/२०२३</u>**

**<u>आदेश निशाणी क्र.५ वर</u>**

प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई आदेश मिळणेसाठी वादीने सादर केला आहे. वादी यांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

२. दावा, अर्ज व कागदपत्र वाचले. विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष व कारणमीमांसा पुढीलप्रमाणे नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींच्या हक्कात सकृतदर्शनी बाजू आहे का? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे का? | होय. |
| ३. | विनंतीप्रमाणे मनाई आदेश न दिल्यास वादींची अपरिमित नुकसान होणार आहे का? | होय. |
| ४. | वादी विनंतीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई आदेश मिळणेस हक्कदार आहेत का? | होय. |
| ५. | आदेश काय? | ...आदेशाप्रमाणे |

## :: कारणमीमांसा ::

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता. :-**

३. वादीचे विव्दान वकीलांनी एकतर्फा अंतरिम तुर्तातुर्त मनाई आदेश जारी करणेबाबत दिनांक २३.०२.२०२३ रोजी

युक्तीवाद केला होता. परंतु प्रतिवादी यास आदेश जारी करणेपुर्वी म्हणणे मांडणेची संधी देणे योग्य वाटले, या कारणास्तव प्रतिवादी यांस नोटीस जारी करण्याचा आदेश दिनांक २३-०२-२०२३ रोजी पारीत करण्यात आला. निशाणी ०८ व ०९ प्रमाणे प्रतिवादी यांचेवर दिनांक ०४-०३-२०२३ रोजी दावा समन्स व नोटीस बजावणी झालेली आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १५ चे तरतुदी प्रमाणे समन्स बजावणे वेळी प्रतिवादी उपस्थित नसला तर त्याचे कुटुंबातील सज्ञान व्यक्ती पुरुष किंवा स्त्री यांचेवर बजावणी करता येते. दिनांक ०४.०३.२०२३ रोजी प्रतिवादी याचे पत्नीने प्रतिवादीचे वतीने दावा समन्स व अर्ज नोटीस स्विकारली आहे व सही केली आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १५ तरतुदी प्रमाणे प्रतिवादी याचेवर दावा समन्स व अर्ज नोटीस बजावणी झालेली आहे. दिनांक ०९-०३-२०२३ रोजी प्रतिवादीस न्यायालयात हजर होणे आदेशीत केले होते, परंतु प्रतिवादी दिनांक ०९-०३-२०२३ रोजी तसेच त्यानंतर दिनांक १४-०३-२०२३ रोजी न्यायालयात हजर झाला नाही. आज रोजी दुपारी ०४-४० पर्यंत प्रतिवादी यास पुकारले असता उपस्थित नाही.

४. वादीचे विद्वान वकीलांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. दावा मिळकत सदनिका याचे कराराची विशेष पुर्तता आदेश मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. वादीच्या हक्कात सकृतदर्शनी बाजू व न्यायाचा समतोल आहे का हे तपासणे आवश्यक आहे. निशाणी ४ यादी सोबत वादीने एकुण २० दस्त दाखल केले आहे. दिनांक २५.०८.२००३ रोजीचा पुर्णविक्री करारनामा दर्शवितो की, सदनिका प्रतिवादी याने अनिल मिस्त्री याचेकडुन खरेदी केलेली आहे. माझगांवा कोर्टातील फौजदारी

खटला क्रमांक १९०/२००६ कलम १३८ निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट दर्शविते की एच.डी.एफ.सी बॅंकेने प्रविादी विरुध्द धनादेश अनादर खटला दाखल केला होता. निशाणी ४/३ विक्री करारनामा पार्ट पेमेंट दिनांक ०७.०७.२००६ रोजीचे दर्शविते की, प्रतिवादी याने वादींचे पुर्वज प्रविण महादेव पाटील याचे सोबत दावा सदनिका विक्री करारनामा रु. ६,००,०००/- रक्कमेवर केला होता व त्यापैकी रक्कम रु. १,००,०००/- स्विकारले होते. निशाणी ४/९ प्रतिवादी याने दिनांक १८.०३.२०२० रोजी वादी क्र. १ व २ यांना दिलेली नोटीस दर्शविते की, प्रतिवादी याने वादींचे पुर्वज प्रविण पाटील यांचेशी दावा सदनिका रक्कम रु. ६,००,०००/- किंमतीवर विक्रीचा करार केला होता हे मान्य केले आहे. दावा सदनिका विक्री करारनामा, बॅंकेचे उतारे, विशेष करून प्रतिवादी याने वादीस दिनांक १८-०३-२०२० रोजी वकीलामार्फत दिलेली नोटीस व त्यातील पत्ता यावरून दावा सदनिका वादींचे ताब्यात आहे असे सकृतदर्शनी दिसते. वादीने सादर केलेले कागदपत्र यावरून वादीच्या हक्कात सकृतदर्शनी बाजू व न्यायाचा समतोल आहे. मनाई आदेश न दिल्यास वादीचा कब्जा यास अडथळा निर्माण होईल तसेच त्रयस्थ व्यक्तीचे हितसंबंध निर्माण झाल्यास गुंतागूंत निर्माण होईल व त्याद्वारे वादीचे नुकसान होणार आहे. नोटीस बजावणी होवून देखील प्रतिवादी उपस्थित झाला नाही. यास्तव प्रतिवादीस अर्ज कथन मान्य आहे असा अर्थ काढणेस पुरेसे कारण आहे. यास्तव मुद्‌दे क्र. १ ते ४ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे. पर्यायाने अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी ०५ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. दाव्याचे अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादीने दावा सदनिका मिळकतीवरील वादीचे ताबेकब्जास हरकत, अडथळा निर्माण करू नये तसेच दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारे त्रयस्थ व्यक्तीचे हक्क, हितसंबंध निर्माण करू नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश वादीच्या हक्कात व प्रतिवादीविरूध्द जारी करण्यात येत आहे.

पनवेल,
दिनांक : १६-०३-२०२३.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.